वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-गुरूवार दि.२७ नोव्हेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# चिन्ह मिळाले; ४ दिवसांत २ लाख मतदारांपर्यंत पोहोचण्याचे आव्हान

## चिठ्ठी काढून उमेदवारांना वाटप केले चिन्ह, कपबशीसाठी रस्सीखेच



Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com
दिव्य वार्ता

### त्या बाकड्यावरील नावे कलर मारून पुसली

बीड शहरातील काही उद्यानात वृद्धांना बसण्यासाठी बाकडे टाकण्यात आलेली आहे. ती बाकडे देणाऱ्यांची नावे ठळकपणे दोन दिवसांपूर्वी टाकण्यात आली. त्यावर एका उमेदवाराने बीड पालिकेत तक्रार केली होती. त्यानंतर बाकड्यावरील नावे पालिकेच्या कर्मचाऱ्यांनी कलर मारून पुसून टाकली.

### हद्दवाढीमुळे उमेदवारांची कोंडी

बीड शहरात हद्दवाढ झालेल्या भागात प्रचार करतांना उमेदवारांची मोठी कोंडी होत आहे. अनेकांचे मतदानच बीडमध्ये नाही. मात्र ते बीड शहरातील हद्दवाढ भागात राहत आहेत. उमेदवार घराघरात जात असून, मी आपल्यासाठी हे केले. ते केले, असे सांगून मलाच मतदान करा, अशी विनवणी करत आहेत. उमेदवारांचे सगळ ऐकून घेऊन साहेब आमचे इथे मतदानच नाही. नसता तुम्हालाच टाकल असतं ? असे उत्तर मिळले की, उमेदवार गप्प पुढे निघून जात असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

### बीड पालिकेत १२ जणांना मिळाले चिन्ह

बीड शहरातील २६ वॉर्डात एकूण १ लाख ८० हजार ६५८ मतदार आहे. नगराध्यक्ष पदाला उभा असलेल्या १९ पैकी तब्बल १२ उमेदवारांना बुधवारी चिन्ह मिळाले. आता हे चिन्ह घेऊन उमेदवार प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचणार आहे. परंतु, चार दिवसांत मतदारांपर्यंत पोहोचणे हे त्यांच्यासमोर मोठे आव्हान आहे.

बीड । दिव्य न्युज

बीड नगरपालिकेत बुधवार, २६ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता चिन्हाचे वाटप करण्यात आले. पालिकेत कपबशी हे चिन्ह नगराध्यक्षपदाच्या चार उमेदवारांनी मागितले होते. निवडणूक निर्णय अधिकारी कविता जाधव यांनी चिठ्ठी काढत एका उमेदवाराला ते दिले. इतर उमेदवारांना दिलेल्या पर्यायानुसार चिन्ह वाटप करण्यात आले. चिन्ह मिळताच उमेदवारांची बॅनर, पोस्टर, रिक्षा लावून ते घराघरात कसे पोहोच करता येईल याची लगबग सुरू होती. मात्र ४ दिवसांत १ लाख ८० हजार ६५८ मतदारांपर्यंत पोहोचण्याचे आव्हान उमेदवारांसमोर आहे. अधिकृत पक्षाच्या उमेदवारांनी प्रचाराचा धुरळा उडवला आहे. मतदारांच्या गाठीभेटी घेऊन त्यांचे चिन्ह घराघरात पोहोचले आहे. २ डिसेंबर ला मतदान आहे. प्रचारासाठी अवघे ४ दिवस शिल्लक असताना आता अपक्ष उमेदवारांना हातात चिन्ह मिळाले आहे. चार दिवसांत प्रचार यंत्रणा उभी करून मतदारांपर्यंत पोहोचणे, त्यांना आपले व्हिजन समजावून सांगणे हे अपक्ष उमेदवारांपुढे मोठे आव्हान आहे. नगराध्यक्षपदासाठी सहा पालिकेत १८६, तर नगरसेवकपदासाठी ८४० उमेदवार रिंगणात आहेत. २ डिसेंबर रोजी मतदान होणार असून, ३ डिसेंबरला निकाल जाहीर होणार आहे.

### ते बॅनर पालिकेने हटवले

बीड शहरात प्रचाराचे बॅनर जागोजागी झळकलेले आहेत. अनेक उमेदवारांनी परवानगी घेताना ज्या जागेची परवानगी घेतली. तेथे बॅनर न लावता ते उमेदवारांनी सोयीच्या ठिकाणी लावले. बुधवारी पालिकेच्या पथकांनी स्थळपाहणी केली. परवानगी एका जागेची अन् बॅनर दुसरीकडे झळकवले, असे बॅनर पालिकेने हटवले आहेत.

## घड्याळ झाले गजर! राजीव नगरात प्रेमलताताई पारवे यांच्यासाठी नागरिकांचा 'राष्ट्रवादी' कडे झुंजार कल!









बीड । दिव्य न्युज

नगरपरिषद निवडणुकीच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, आणि शिवसंग्राम मित्र पक्षाच्या वतीने नगराध्यक्ष उमेदवार प्रेमलताताई दादाराव पारवे आणि प्रभाग १३ मधील नगरसेवक पदाचे उमेदवार श्रीमती वाघचौरे मीना भीमराव व श्रीमती जयश्री विलास विधाते यांच्यासाठी राजीव नगर (धानोरा रोड) येथे जोरदार गाठी-भेटी आणि प्रचार दौरा संपन्न झाला. यावेळी प्रमुख उपस्थितीत शेख मुजीब यांनी नागरिकांशी संवाद साधला. या प्रचार भेटीला राजीव नगर परिसरातील नागरिकांनी भरभरून प्रतिसाद दिला, ज्यामुळे निवडणुकीच्या वातावरणात एक नवा उत्साह संचारला आहे. भेटीदरम्यान विकासावर भर देऊन प्रचार दौऱ्यादरम्यान नगराध्यक्ष उमेदवार प्रेमलताताई पारवे यांच्या वतीने शेख मुजीब यांनी बीड शहराच्या सुसंस्कृत विकासाची आणि नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडवण्याची ग्वाही दिली. प्रभाग १३ मधील नगरसेवक पदाच्या उमेदवारांनी आपल्या प्रभागातील रस्ते, पाणी आणि स्वच्छतेच्या प्रश्नांवर त्वरित उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. यावेळी नागरिकांनी उत्स्फूर्तपणे पुष्पहार घालून उमेदवारांचे स्वागत केले. नागरिक मोठ्या संख्येने स्वयंस्फूर्तीने सहभागी झाल्यामुळे, युतीच्या उमेदवारांना भरभक्कम पाठिंबा असल्याचे स्पष्ट झाले. गाठीभेटींमुळे मतदारांशी थेट संपर्क साधता आला आणि त्यांच्या अपेक्षा जाणून घेता आल्या.

## इम्तियाज जलील यांच्या सभेला अभूतपूर्व प्रतिसाद



### मोमीनपुरा-मक्का चौकातील सभा ठरली हाऊसफुल!



बीड । दिव्य न्युज

बीड नगरपालिकेच्या रणसंग्रामात आता राजकीय तापमान चरमसीमेवर पोहोचले असून, दिनांक २६ नोव्हेंबर रोजी मोमीनपुरा व मक्का चौक परिसरात झालेली एमआयएमची सभा शहरभर चर्चेचा विषय ठरली आहे. सभा स्थळी एवढी प्रचंड गर्दी झाली की रस्ते, गल्ली-बोळ तसेच घरांच्या छतांवरूनही लोकांनी भाषण पाहिले. अनेकांना कार्यक्रमस्थळी उभे राहण्यापुरतीही जागा मिळाली नाही.सभेस उपस्थित राहिलेल्या माजी खासदार इम्तियाज जलील यांच्या भाषणाने वातावरण अक्षरशः पेटून उठले. जनतेने घोषणाबाजी करत त्यांचे भव्य स्वागत केले. बीड शहरात या निवडणुकीची ही आतापर्यंतची सर्वात मोठी सभा ठरली, असे राजकीय वर्तुळात म्हटले जात आहे.

खासदार इम्तियाज जलील भाजपवर तुटून पडले

सभेत बोलताना जलील यांनी भारतीय जनता पार्टी व आरएसएसवर थेट आरोप करत मुस्लीम समाजाला विविध स्तरांवर लक्ष्य केल्याचे मुद्देसूद उदाहरणांसह मांडले.ते म्हणाले,ज्याला जी भाषा कळते त्याच भाषेत उत्तर देण्यासाठी आम्ही आलो आहोत. एमआयएम कधीही कोणाकडे झुकणार नाही, आणि अन्यायाविरुद्ध आवाज बुलंद ठेवत राहील.त्यांनी उपस्थित नागरिकांना मोठ्या संख्येने मतदान करण्याचे आवाहन करत, हा फक्त मतदानाचा दिवस नाही, तर आपल्या हक्कांचा निर्णय घेण्याचा क्षण आहे, असे ठामपणे सांगितले.त्यांच्या भाषणाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, सभेनंतर एमआयएमचे केडर नव्या उर्जेसह सक्रिय झालेले दिसत आहे.

## बाळासाहेब गुंजाळ यांनी केलेल्या कामांमुळे जनतेनेच त्यांची निवडणूक हाती घेतली

### काम करत आलोय, काम करत राहू फक्त आशिर्वाद द्या-बाळासाहेब गुंजाळ



बीड । दिव्य न्युज

बीड शहरातील प्रभाग क्र.२१ ब मधील अजित दादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस , शिवसेना आणि शिवसंग्राम मित्र पक्षाचे उमेदवार धर्मराज ऊर्फ बाळासाहेब लक्ष्मण गुंजाळ यांनी आत्तापर्यंत केलेल्या कामांमुळे जनतेनेच त्यांची निवडणूक हाती घेतली आहे. आजपर्यंत जनेसवेसाठी काम करत आलोय आणि यापुढेही काम करत राहू ,तुम्ही फक्त आशिर्वाद द्या असे आवाहन बाळासाहेब गुंजाळ यांनी केले आहे.

बीड शहरातील प्रभागातील असो की इतर ठिकाणच्या नागरिकांचे कोणतेही काम असो त्या ठिकाणी बाळासाहेब गुंजाळ २४ तास सेवेत असतात. पाणी, रस्ते, नाल्या, लाईट या मुलभूत सुविधांसाठी ते नेहमीच तत्पर असतात. सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या या माझ्या स्वत:च्या समस्या आहेत असेच समजून त्यांनी आत्तापर्यंत लोकांची कामे केली आहेत.बीड शहरातील प्रभाग क्र.२१ मधील गांधी नगर हा भाग २०११ च्या पूव बहिरवाडी ग्रामपंचायत हद्दीत येत होता. मात्र २०११ मध्ये या भागाचा न.प.हद्दीमध्ये समावेश झाला. तेव्हापासून आजपर्यंत बाळासाहेब गुंजाळ यांनी या भागामध्ये तीन पाण्याच्या टाक्या उभ्या केल्या. वादात असलेली जागा नगर पालिकेला मिळवून देवून त्या ठिकाणी या टाक्या उभा करण्याचे काम त्यांनी केले. नाळवंडी रोड, नगर परिषदत हद्दीमधील रस्त्याची अवस्था अतिशय बिकट झाली होती. हा रोड जिल्हा परिषद हद्दीत असतानाही हा रस्ता नगरपालिकेकडून मंजुर करुन घेत लोकांची गैरसोय दुर केली. नाथापुर रोड हा रस्ता तेलगाव नाका ते खंडेश्वरी पर्यंत करुन घेतला. २०११ ते २०२५ या कालावधीत या भागात १५ ते २० डि.पी. मंजुर करुन घेतल्या. प्रभागातील कुबा मस्जिद, रहेमानिया मस्जिद, नुर मस्जिद, नुराणी मस्जिद, बजरंगबली मंदिर, गांधी नगर, थलमा मंदिर, महादेव मंदिर, या भागात अनेक लहान मोठे रस्ते केले. नाल्या केल्या, विजेची कामे पूर्ण केली.प्रभागातील नागरिकांना कसलाच त्रास होवू नये यासाठी सातत्याने प्रयत्न केले. घरकुल, रहिवाशी प्रमाणपत्र, पिटीआर, ई श्रमकार्ड, आधार कार्ड, मतदान कार्ड अशा विविध कागदोपत्रांसाठी प्रत्येकवेळी नागरिकांना मदतीची

## २ डिसेंबरनंतर राज्यात होणार मोठी राजकीय उलथापालथ? शरद पवार गटाची मोठी खेळी

मुंबई । दिव्य न्युज

राज्यात सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुरू आहेत, या निवडणुकीमध्ये जवळपास सर्वच पक्षांनी स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतल्यानं अनेक ठिकाणी भाजप आणि शिवसेना शिंदे गट आमने-सामने आल्याचं पहायला मिळतं आहे. या पार्श्वभूमीवर दोन्ही पक्षातील संघर्ष देखील वाढला आहे, शिवसेना शिंदे गटातून भाजपमध्ये जोरदार इनकमिंग सुरू असल्यानं शिवसेना शिंदे गट नाराज आहे, तर दुसरीकडे बुधवारी शिवसेना शिंदे गटाचे नेते निलेश राणे यांनी थेट भाजप कार्यकर्त्यांच्या घरात घुसून, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये भाजप मतदारांना पैसे वाटत असल्याचा आरोप केला आहे.

## प्रभागाचा विकास कसा असतो हे नगरसेवक संजय उडाण यांनी दाखवून दिला

### प्रभागात करोडो रूपयाचे दर्जेदार सिमेंट रस्ते, सिमेंट नाल्या, पाईपलाईन, विद्युत कामे







बीड । दिव्य न्युज

बीड शहरातील प्रभाग क्र.२६ आताचा जुना प्रभाग क्र.२५ या प्रभागातून मतदारांनी निवडून दिलेले नगरसेवक संजय उडाण यांनी पाच वर्षात प्रभागाचा चेहरा मोहराच बदलला ज्या ठिकाणी पाय चालायला रस्ते नाही रस्त्यावर नीट चलता येत नाही अशा रस्त्यावर करोडो रूपयाची निधी शासनाकडून आणून या ठिकाणी दर्जेदार टिकावू उत्कृष्ट दर्जेचे साहित्य वापरून सिमेंट रस्ते तयार करण्यात आले महत्वाचा रस्ता म्हणजे बार्शी नाका चौक, ते इमामपुर रोड गारूडी वस्ती पर्यंत झालेला सिमेंट रस्तेचा काम आपल्याला आज ही पाहता येईल त्याचसोबत बार्शी रोड ते जे.के. कॉम्पलेक्सच्या पाठीमागे झालेल्या रस्त्याचा काम आज ही मजबुत आणि दर्जेदार आहे संपुर्ण प्रभागात उच्च दर्जेचे पाईप आणून पाईपलाइन करण्यात आली प्रत्येक घरात नळ कनेक्शन देण्यात आले त्यामुळे प्रत्येक घरात आज नळाला पाणी येतो ऐकाकाळी या परिसरातील नागरीकाना इतर परिसरातून स्वताच्या डोक्यावर हंडे भांडे ठेवून पाणी आणावे लागायचे संजय उडाण हे नगरसेवक झाले की त्यांनी सर्व प्रथम पिण्याचे पाण्याचा प्रश्न कायमचा निकाली काढला प्रभागात नवीन डी.पी., नवीन पोल, मोठया प्रमाणात बसविण्यात आले सर्व पोल वर एलईडी लाईट असल्याने रात्रीच्या वेळी हा परिसर रोशनाईने

▶▶ पान २ वर



# ७३ कोटींचा भूसंपादन घोटाळा; सात वकील, कर्मचारी कधी पकडणार ?

## तपासासाठी एसआयटी : अजित पवारांकडून बीडच्या प्रकरणाचा राज्यभरात होतोय बोभाटा




बीड । दिव्य न्युज

राष्ट्रीय महामार्गासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला वाढवून देण्यासाठी तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांच्या नावाने बनावट आदेश तयार करून शासनाची ७३ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार दि. १९ नोव्हेंबर रोजी समोर आला होता. याप्रकरणी महसूल कर्मचारी, वकिलांसह दहाजणांवर गुन्हा दाखल झाला. यातील तिघांना पहिल्याच दिवशी अटक करण्यात आली, परंतु इतर सातजण अजूनही मोकाटच आहेत. या प्रकरणाच्या तपासासाठी एसआयटी स्थापन केली असून, ८० शेतकऱ्यांचे जबाब नोंदविले आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार हे राज्यभर या प्रकरणाचा बोभाटा करत असतानाही बीड पोलिसांकडून तपासात गती येत नसल्याचे दिसत आहे.

### एसआयटीची दररोज बैठक

प्रकरणाच्या तपासासाठी अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या नेतृत्वात एसआयटी स्थापन केली आहे. उपअधीक्षक पूजा पवार तपास अधिकारी असून, एलसीबीचे पोलिस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, शिवाजीनगरचे प्रवीणकुमार बांगर, आर्थिक गुन्हे शाखेचे अधिकारी, कर्मचारी असा दहाजणांचा एसआयटीत समावेश आहे. या पथकासोबत पांडकर दररोज बैठक घेतात.

### महसूलचे अधिकारी मदतीला द्या

हे प्रकरण गंभीर आणि किचकट असल्याने पोलिसांनी तपासात कायदेशीर मदत व्हावी, यासाठी एक महसूल अधिकारी द्यावा, अशी विनंती जिल्हाधिकाऱ्यांना केली आहे. ज्यांना सर्व कायदे आणि प्रकरणाची माहिती आहे, अशांची मदत झाल्यास तपासाला गती येईल, असा पोलिसांचा दावा आहे.






### हे तिघे अटक, तर सात फरार

या घोटाळ्यात शासकीय कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी आणि वकील अशा दहाजणांवर शिवाजीनगर ठाण्यात गुन्हा दाखल झाला. यातील संजय हांगे (सहायक महसूल अधिकारी), त्र्यंबक पिंगळे (कंत्राटी कर्मचारी), शेख अजहर शेख बाबू (कंत्राटी कर्मचारी) या तिघांना अटक करण्यात आली आहे, तर पांडुरंग पाटील (सहायक महसूल अधिकारी), राऊत (महामार्ग कार्यालय कर्मचारी), अविनाश चव्हाण (डाटा एंट्री ऑपरेटर), ॲड. एस. एम. नन्नवरे, ॲड. पिसुरे, ॲड. प्रवीण राख आणि ॲड. नरवाडकर हे अजूनही मोकाट आहेत.

### रेकॉर्डिंग, चौकशी अहवाल जप्त

पोलिसांनी जिल्हाधिकारी कार्यालयाचा चौकशी अहवाल आणि काही रेकॉर्डिंग्ज जप्त केले आहेत. ते ऐकून पुढील कार्यवाही केली जाणार आहे. तसेच १५४ पैकी १४८ संचिका पोलिसांना उपलब्ध करून दिल्या आहेत; अजूनही सहा संचिका बाकी आहेत.

### काय आहे प्रकरण?

राष्ट्रीय महामार्ग अधिनियमानुसार संपादित जमिनींना वाढीव मोबदला (मावेजा) मिळवण्यासाठी खातेदार जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज करतात.

बीडचे तत्कालीन जिल्हाधिकारी ३ अविनाश पाठक दि. २२ एप्रिल २०२५ रोजी बदलून गेल्यानंतरही, त्यांच्या कार्यकाळातील मागच्या तारखा वापरून १ मार्च २०२५ ते १७ एप्रिल २०२५ या दरम्यानचे बनावट आदेश काढण्यात आले.

३ या बनावट आदेशांद्वारे १५४ प्रकरणांमध्ये मूळ मोबदला ६८ कोटी ५८ लाखांवरून थेट ३१० कोटी २० लाख रुपयांवर वाढविण्यात आला.

४ सदर १५४ प्रकरणांमध्ये जवळपास २४१ कोटी ६२ लाख रुपये वाढीव मोबदल्याचे बनावट आदेश तयार करण्यात आल्याचे निदर्शनास आले. यापैकी अंदाजे ७३ कोटी ४ लाख रुपये संबंधित खातेदारांना वाटपही झाले आहेत.

विशेष म्हणजे संबंधित आदेश पारित करताना कोणतेही रजिस्टर किंवा नोंदवही भूसंपादन समन्वय कार्यालयाने ठेवली नाही.

“तपासासाठी एसआयटी आहे. तीन आरोपी अटक असून, इतरांचाही शोध सुरू आहे. तसेच तपासही गतीने केला जात आहे. शेतकऱ्यांसह काही अधिकाऱ्यांचे जबाब घेतले आहेत. जसजशी नावे निष्पन्न होतील, तसतसे लोकांना चौकशीसाठी बोलावले जाईल.
पूजा पवार, उपअधीक्षक, बीड

---

## गेवराईत राष्ट्रवादीच्या उमेदवाराचे निधन माजी आ.अमरसिंह पंडित यांनी केले सांत्वन

गेवराई । दिव्य न्युज

गेवराई नगर परिषद निवडणुकीतील प्रभाग क्रमांक ११ अ मधील अजित दादा पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेविका पदाच्या उमेदवार दुरदाना बेगम सलीमोद्दीन फारुकी यांचे बुधवार, दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास हृदयविकाराने निधन झाले. आपल्या प्रिय मातोश्रींचे छत्र हरवल्याचे दुःख सहन न झाल्याने रक्तदाब (बी.पी.) वाढल्यामुळे वसीम फारुकी यांना शहरातील गेवराई क्रिटिकल केअर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. सदर वृत्त समजताच राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांच्यासह माजी नगराध्यक्ष महेश अण्णा दाभाडे, मुफ्ती गयास



जागीरदार, राष्ट्रवादीचे युवक कार्यकर्ते अमोल होंडे, सय्यद नईम अत्तार, संपादक अमोल वैद्य, मंजूर बागवान, शेख अमजद उर्फ बब्बू यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी रुग्णालयात जाऊन वसीम फारुकी यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

## पोकळ आश्वासनं नको; लिखित वचन देणाऱ्या उमेदवारांनाच निवडून द्या ;एस.एम.युसूफ यांचे मतदारांना आवाहन



बीड । दिव्य न्युज

बीड नगर परिषद साठी येत्या २ डिसेंबर रोजी मतदान होणार असून ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होऊन निकाल लागणार आहे. या निवडणुकीत बीड शहरातील तीन कामे करण्याचे आश्वासन नाही तर लिखित वचन देणाऱ्या उमेदवारांनाच निवडून द्या नसता पुन्हा या तिन्ही प्रश्नांसाठी पुढच्या निवडणुकीपर्यंत नुसती वाट पहात बसावे लागेल याचे भान असू द्या असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, बीड शहरातील खासबाग-मोमीनपुरा हे दोन मोठे भाग जोडण्याकरिता बिंदुसरा नदीवरील नियोजित पुलाचे निर्माण, शहराची ओळख असलेले ऐतिहासिक कारंजा टॉवर चे परिपूर्ण नूतनीकरण व सुशोभीकरण आणि मोमीनपुरा भागातील ऐतिहासिक महेदवीया दायरा च्या संरक्षक भिंती बांधणे. या तिन्ही प्रश्नी गेल्या काही वर्षांपासून शासन-प्रशासनासह बीड जिल्ह्याचे विद्यमान पालकमंत्री व राज्याचे उपमुख्यमंत्री यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून सुद्धा यापैकी एकही प्रश्न राजकारणी शासन असो की प्रशासन की पालकमंत्री कोणीही अद्याप पर्यंत सोडविले नाही. प्रशासनिक अधिकारी मग ते जिल्हाधिकारी असो, मुख्याधिकारी असो की तहसीलदार असो अशा प्रश्नांकडे ढुंकून सुद्धा पाहायला तयार नाहीत. दुसरीकडे लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आल्याने राजकारणी आमदार यांनी बीड शहरवासियांसाठी हे प्रश्न सोडविणे आवश्यक असून सुद्धा गेल्या सात वर्षात या प्रश्नांविषयी प्रसिद्धी माध्यमातून फक्त गवगवा केला. यात पुलाच्या निर्माणासाठी काही वेळा बिंदुसरा नदीत चक्कर मारून पुलनिर्माणाचा आव आणला व आणत आहेत. आमदारांनी महेदवीया दायरा कब्रस्तान चा पाहणी दौरा करून कब्रस्तानच्या संरक्षक भिंती बांधून देण्याचे आश्वासन सोबत असलेल्या माजी आमदारासह अनेकांच्या उपस्थितीत दिले होते. त्याला आता तीन वर्षे झाली आहेत. तरीही या कब्रस्तानच्या संरक्षक भिंती अजून बांधून दिल्या नाहीत. बीडचे आमदार असूनही ऐतिहासिक कारंजा टॉवरच्या प्रश्नांकडे आजपर्यंत ढुंकून सुद्धा पाहिले नाही. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वी याच कारंजा टॉवरच्या बाजूला असलेल्या चहाच्या हातगाड्यावर जाऊन त्यांनी माजी आमदार व कार्यकर्त्यांसह चहाचा आस्वाद घेतला. या सर्व बाबी पाहता हे तिन्ही प्रश्न असणाऱ्या प्रभागातील मतदारांनी या तिन्ही प्रश्नांसाठी शासन-प्रशासनासमोर उभे राहून लढा देण्याची धमक असलेल्या उमेदवारांनाच या प्रभागातून नगरसेवक पदी निवडून द्यावे. तसेच हे तिन्ही प्रश्न सोडविण्याचे पोकळ आश्वासन नव्हे तर ही तिन्ही कामे प्राधान्याने करण्याचे लिखित वचन देणाऱ्या उमेदवारालाच नगराध्यक्ष पदी निवडून द्या नसता पुन्हा या तिन्ही प्रश्नांसाठी पुढच्या निवडणुकीपर्यंत नुसती वाट पहात बसावे लागेल याचे भान असू द्या. असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी केले आहे.

---

## स्त्री व कुटीर रुग्णालय, नेकनूर येथे ग्रामपंचायतीची मधुकर सचिन शिंदे उपसरपंच पाहणी भेट

### सेवांच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह?

नेकनूर । दिव्य न्युज

नेकनूर येथील स्त्री व कुटीर रुग्णालयात आज अचानक भेट देत स्टिंग ऑपरेशन करण्यात आले. रुग्णांना मिळणाऱ्या सेवा, सुविधा आणि व्यवस्थेची वास्तव स्थिती जाणून घेण्यासाठी ही तपासणी विशेषतः राबवण्यात आली. भेटीदरम्यान रुग्णांना योग्य उपचार मिळतात का, नाश्ता व जेवणाची गुणवत्ता समाधानकारक आहे का, तसेच रुग्णालयातील आवश्यक सुविधा योग्य मिळतात का याची सविस्तर विचारपूस करण्यात आली. त्याचप्रमाणे कर्मचारी वेळेवर हजर राहतात का नाही याचीही पाहणी करून संबंधित कर्मचाऱ्यांशी चर्चा करण्यात आली. तपासणीदरम्यान वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसोबत विविध मुद्द्यांवर चर्चा करत रुग्ण व येणाऱ्या नागरिकांच्या तक्रारी जाणून घेण्यात आल्या. सेवांमध्ये सुधारणा आवश्यक असलेल्या काही बाबींबाबत सूचना देण्यात



आल्याचेही सांगण्यात आले. या स्टिंग ऑपरेशनवेळी ग्रामपंचायत सदस्य जयदीप भैय्या काळे, नदीम मंडला, विलास राऊत, अशोक शिंदे, केतन रोकडे, मुजीबभाई अत्तर, तसेच पत्रकार अमजद पठाण, पत्रकार शाकेर शेख आणि. उपस्थित होते. या तपासणीमुळे रुग्णालयातील सेवा व्यवस्थेची खरी परिस्थिती समोर आली असून, सुधारणा आवश्यक असलेल्या बाबींवर पाठपुरावा करण्याचा निर्धार ग्रामपंचायतीने व्यक्त केला आहे.

## अलहुदा उर्दू हायस्कूलमध्ये संविधान दिन उत्साहात साजरा

### भारतीय संविधानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगत विविध उपक्रमांचे आयोजन





बीड । दिव्य न्युज

नूर एज्युकेशनल अँड वेल्फेअर सोसायटी संचलित अलहुदा उर्दू हायस्कूल, बीड येथे संविधान दिन मोठ्या उत्साहाने आणि शैक्षणिक वातावरणात साजरा करण्यात आला. देशाच्या लोकशाही सामर्थ्याचे प्रतीक असलेल्या भारतीय संविधानाची महती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमात वर्ग आठवी, नववी आणि दहावीतील विद्यार्थ्यांनी संविधानाचे महत्व, इतिहास, प्रस्तावना आणि नागरिकांचे मूलभूत अधिकार या विषयांवर मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी संविधानाच्या मूलभूत तत्त्वांचे सविस्तर विश्लेषण करून लोकशाही मूल्यांचे संवर्धन करण्याचा संदेश दिला. यावेळी संविधानावर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करून विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची चाचणी घेण्यात आली. तसेच विविध घटकांवर आधारित आकर्षक पोस्टर प्रदर्शनही विद्यार्थ्यांनी सादर केले. संविधानाशी संबंधित माहितीपूर्ण चित्रे, कायद्याचे कलम, प्रस्तावना आणि भारतीय नागरिकांचे कर्तव्य यांचे सुंदर सादरीकरण उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख शेख अब्दुल हमीद यांनी उत्कृष्टरीत्या केले. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक डॉ. पठाण सिराज खान यांनी भारतीय संविधानाची निर्मिती प्रक्रिया, त्यातील वैशिष्ट्ये तसेच सामान्य नागरिकांना मिळणारे मूलभूत अधिकार, कर्तव्ये आणि न्यायसंस्थेची भूमिका याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

---

# निवडणूक लागली, जिल्ह्यातील ८४७ शस्त्रे पोलिसांत झाली जमा

## मुदतीत शस्त्र जमा न केल्यास जिल्हा प्रशासनाकडून शस्त्र परवाना कायमस्वरूपी होणार रद्द

बीड । दिव्य न्युज

जिल्ह्यात नगर पालिका निवडणूक आचारसंहिता लागू होताच कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्ह्यात परवानाधारक शस्त्रे जमा करण्याची प्रक्रिया वेगाने सुरू झाली आहे. मंगळवारपर्यंत (२६ नोव्हेंबरपर्यंत) एकूण १०६७ परवानाधारक शस्त्रधारकांपैकी ८४७ शस्त्रे पोलिस ठाण्यांमध्ये जमा झाली आहेत. उर्वरित शस्त्रे पुढील दोन दिवसांत जमा होतील, अशी अपेक्षा असून, प्रशासनाने सर्व नागरिकांना सहकार्य दिलेल्या मुदत परवानाधारकांनी शस्त्र जमा करण्याचे आवाहन केले आहे. अन्यथा शस्त्र परवाना रद्दही होऊ शकतो. तर यांना नियमातून सूट शासकीय सुरक्षा कर्मचाऱ्यांसह अत्यावश्यक आणि विशेष सुरक्षा कारणास्तव एकूण २३ जणांना या नियमातून तात्पुरती सूट दिली आहे.

परवानाधारक शस्त्रे पोलिस ठाण्यात जमा करणे गरजेचे आचारसंहिता लागू झाल्यावर शांतता व सुव्यवस्थेसाठी परवानाधारक शस्त्रे नजीकच्या पोलिस स्टेशनमध्ये जमा करणे बंधनकारक असते.

### एकूण शस्त्र परवानाधारक

बीड जिल्ह्यात एकूण १०६७ जणांकडे शस्त्र परवाने जारी करण्यात आले आहेत. आता निवडणूकीत शस्त्र जमा करून घेतले जात आहेत.

### जमा केलेली शस्त्रे


मंगळवार (२६ नोव्हेंबर) पर्यंत ८४७शस्त्रे जमा करण्यात आली आहेत. उर्वरित शस्त्रे दोन दिवसांत जमा होण्याची अपेक्षा आहे.

### कोणाकडे आहेत परवाने?

स्वसंरक्षणासाठी शस्त्र परवाने घेणाऱ्यांमध्ये प्रामुख्याने बिल्डर, राजकीय नेते (लीडर), डॉक्टर, राजकीय नेते आणि मोठे व्यापारी यांचा समावेश आहे.

### जमा न केल्यास काय कारवाई?

मुदतीत शस्त्र जमा न करणाऱ्यांवर परवान्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी कायद्यानुसार कारवाई केली जाईल. तसेच, जिल्हा प्रशासनाकडून त्यांचा शस्त्र परवाना कायमस्वरूपी रद्द केला जाऊ शकतो.



### स्वसंरक्षणासाठी परवाना; नियम व अटी अशा

परवाना मिळवण्यासाठी जीवाला धोका असल्याचा ठोस पुरावा, चारित्र्य पडताळणी आणि वैद्यकीय चाचणी आवश्यक असते. शस्त्र परवाना फक्त स्वसंरक्षणासाठीच वैध असतो.

### अन्यथा कठोर कारवाई

जिल्ह्यात परवानाधारक शस्त्र जमा करण्याची प्रक्रिया सुरळीत सुरू आहे. ज्यांनी अद्याप शस्त्र जमा केले नाही, त्यांनी तातडीने जमा करावे, अन्यथा त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा पोलिसांच्या वतीने देण्यात आला आहे.




# आ.प्रकाश सोळंकेंनी गुत्तेदाराकडून टक्केवारी म्हणून दहा कोटी घेतले

## बाबूराव पोटभरे यांचा गौप्यस्फोट, असा भ्रष्ट आमदार देशात नाही, ते कुणा कुणाच्या उरावर बसले याची ठाण्यात लेखी तक्रार



माजलगाव । दिव्य न्युज

टक्केवारी दिली तरच आ. प्रकाश सोळंके गुत्तेदारांना काम करू देतात, अशाच कामात त्यांनी गुत्तेदाराकडून टक्केवारी म्हणून दहा कोटीही घेतलेले आहेत, असा गौप्यस्फोट बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबूराव पोटभरे यांनी केला आहे. या गौप्यस्फोटाने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे असा भ्रष्ट आमदार मी आपल्या देशात पाहिला नाही, ते आज सध्या नगर पालिकांच्या निवडणूकांचे वातावरण चांगलेच तापलेले आहे. नेत्यांच्या एकमेकांवर आरोपांच्या फैरीही झडत आहेत.

सध्या आ. प्रकाश सोळंके हे या निवडणूकीत सर्वात लक्षवेधी आमदार ठरत आहेत. टिका करताना ते स्वतःच्या पक्षातील नेत्यांनाही आपल्या रडारवर घेत आहेत. नुकतीच त्यांनी धनंजय मुंडेंवर टिका केली होती. आता त्यांना बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबूराव पोटभरे यांनी आपल्या फैलावर घेतले आहे. प्रकाश सोळंके हे निवडणूकीच्या स्पर्धेत नाहीत, माजलगावमध्ये भाजप विरूध्द तुतारी असा खरा सामना आहे. मुळात प्रकाश सोळंके हा भ्रष्ट आमदार आहे, गेल्या पाच वर्षात लुटून खाण्याचे काम त्यांच्याकडून होत आहे. शेकडो कोटींचा निधी त्यांनी आणला, मात्र या निधीमागे त्यांचा टोल १७टक्के एवढा आहे. टक्केवारी दिली तरच ते काम गुत्तेदारांना करू देतात, देशातही अशा प्रकारचा भ्रष्ट आमदार मी पाहिला नाही, माजलगावची जनता त्यांच्यावर प्रचंड चिडलेली आहे. त्यामुळेच ते सध्या बेताल वक्तव्य करत सुटले आहेत, माझ्यावर अनेक व्हिडीओ तयार केले आहेत, माझे संबंध सर्व पुढाऱ्यांशी आहेत, हे सर्वांना माहिती आहे. मात्र अशा वेळी केवळ सोळंके जनतेची दिशाभुल करण्यासाठी खालच्या पातळीवर जावून राजकारण करत आहेत. मागे एक पन्नास कोटींचे काम झाले त्यात प्रकाश सोळंकेंनी दहा कोटी घेतले

त्यानंतर कामाच्या वर्कऑर्डर निघाल्या, तसेच ८४ कोटींच्या पाईपलाईनच्या कामातही त्यांनी दहा कोटी घेतल्याचा गौप्यस्फोट यावेळी पोटभरेंनी केला आहे. विशेष म्हणजे याच्या उरावर बसेल त्याच्या उरावर बसेल असे ते सध्या सांगत आहेत. मात्र ते कुणा कुणाच्या उरावर बसले हे सर्वांना माहित आहे, याची तक्रारही पोलिस ठाण्यात गेली होती, त्यावेळी आम्हीच त्यांना वाचविल्याचा उल्लेख या वेळी पोटभरेंनी केला.

### जरांगेंवरही ते आधी बेतालच बोलले होते

मराठा आंदोलनाच्या वेळी आ. प्रकाश सोळंके हे मराठा समाजाच्या आणि मनोज जरांगे पाटलांच्या विरोधात बोलले होते. वेळ बघून बदलणारा हा माणूस आहे, त्यावेळीही आम्हीच त्यांना वाचविले, असेही यावेळी पोटभरे म्हणाले. उरावर बसायची भाषा करत आहेत, मात्र ते कुणा कुणाच्या उरावर बसले याची ठाण्यात लेखी तक्रार आहे, यातून आम्हीच त्यांना वाचवले असेही पोटभरे यावेळी बोलताना म्हणाले.

# प्रभाग क्र.१६ मध्ये अक्रम बागवान यांचा हाताचा पंजा विजयाचे दिशेने

## प्रभागात मिळतोय मतदारांचा भरभरून प्रतिसाद

## मागील केलेल्या विकास कामामुळे मतदार देत आहे आर्शिवाद









बीड । दिव्य न्युज

शहरातील प्रभाग क्र.१६ मधून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अधिकृत उमेदवार असलेले अक्रम बागवान यांची आई यांना प्रभागात मतदारांकडून भरभरून प्रतिसाद मिळत आहे काल प्रभागात काळलेल्या पदयात्रेला मतदारांनी भरभरून साथ दिल्याने अकरम बागवान यांचा हाताचा पंजा विजयाचे दिशेने वाटचाल करत आहे.

नगरसेवक असतांना अकरम बागवान यांनी प्रभाग क्र.१६ मध्ये कोट्यवधी रूपयाचे विकास कामे केले त्यामुळे त्यांना मतदारांकडुन मोठा प्रतिसाद मिळत आहे. जागोजागी अकरम बागवान यांचा मतदारांकडून स्वागत होत असून त्यांना मतदार विजयाचा आर्शिवाद देत आहे. सर्वांशी मैत्रिपुर्ण संबंध असलेले आणि प्रत्येकांच्या सुख दुखात नेहमी पुढे असणारे अकरम बागवान यांची ओळख आहे. संयमी, शांत स्वभावाचे असलेले अकरम बागवान ज्यांशी त्यांची मैत्री झाली ते कधीच तुटत नाही प्रत्येकाशी प्रेमाने बोलायचे त्यांचे म्हणणे ऐकून घ्याचे त्यांची अडचण दुर करायची त्यांनी सांगितलेले काम होईल तीतक्या लोकर करतात त्यांच्या या लोकप्रियता मुळे त्यांना मोठा प्रतिसाद मिळत आहे. गेल्या ४ दिवसापासून केलेल्या प्रचारात जोरदार मुसंडी मारली आहे. त्यांच्या नियोजनबध्द प्रचारामुळे विरोधक ही धस्तावले आहे. त्यांना मिळालेल्या प्रतिसादावरून २ डिसेंबर रोजी मतदार त्यांच्या पंजा या चिन्हा समोरील बटन दाबून त्यांना नगरसेवक करून बीड च्या नगरपालिकेत तिसऱ्यांदा पाठविणार असून ते फक्त आणि फक्त प्रभागाच्या विकासासाठी.

# वडवणीकरांनो सावधान: शहरात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट, नागरिक भयभीत ; तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी

## ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुले असुरक्षित; अपघातांचा धोका वाढल्याने वाहनचालकही हैराण



वडवणी । दिव्य न्युज
(शेख शरीफ)

वडवणी शहर आणि परिसरात मोकाट कुत्र्यांची संख्या चिंताजनक पातळीवर वाढली असून, रस्तोरस्ती फिरणाऱ्या कुत्र्यांच्या टोळयांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले: महिला आणि लहान मुलांच्या सुरक्षचा प्रश्न ऐरणीवर आला असून, या कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करण्यासाठी प्रशासनाने धडक मोहीम राबवावी, अशी मागणी जोर धरत आहे.

शहरातील विविध भागांमध्ये दिवस-रात्र कुत्र्यांच्या टोळक्यांचा वावर दिसून येतो. अन्नासाठी होणारी भांडणे आणि मोठ्याने ओरडण्यामुळे परिसरात अशांतता निर्माण झाली आहे. अनेकदा ही कुत्री अचानक वाहनांच्या आडवी येत असल्याने अपघात घडत आहेत. रस्त्यावरून चालणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांच्या आणि लहान मुलांना घेऊन जाणाऱ्या महिलांच्या अंगावर धावून जाण्याचे प्रकारही वाढले आहेत, त्यामुळे नागरिक, विशेषतः महिला आणि वृद्ध, जीत मुठीत धरून घराबाहेर पडत आहेत. शहरातील विविध भागांमध्ये दिवस-रात्र कुत्र्यांच्या टोळक्यांचा वावर दिसून येतो. अन्नासाठी होणारी भांडणे आणि मोठ्याने ओरडण्यामुळे परिसरात अशांतता निर्माण झाली आहे. अनेकदा ही कुत्री अचानक वाहनांच्या आडवी येत असल्याने अपघात घडत आहेत. रस्त्यावरून चालणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांच्या आणि लहान मुलांना घेऊन जाणाऱ्या महिलांच्या अंगावर धावून जाण्याचे प्रकारही वाढले आहेत, त्यामुळे नागरिक, विशेषतः महिला आणि वृद्ध, जीव मुठीत धरून घराबाहेर पडत आहेत. या मोकाट कुत्र्यांमुळे संसर्गजन्य आजार पसरण्याची भीतीही नागरिक व्यक्त करत आहेत. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे कुत्र्यांची पैदास वाढत असून, आगामी काळात ही समस्या अधिक गंभीर स्वरूप धारण

►► पान २ वर

# बीड शहराच्या विकासासाठी काँग्रेसच्या हातासमोरील बटण दाबुन सर्व उमेदवारांना विजयी करा-गणेश बजगुडे पाटील



बीड । दिव्य न्युज

बीड नगरपालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरु असुन मागील अनेक वर्ष बीडकराणी वारंवार अनेकाना मोठ्या अपेक्षेने निवडूण देण्याचे काम केले परंतु त्यांनी कुठल्याही प्रकारचा विकास शहराचा केलेला दिसत नाही. शहरवासीयांच्या ज्या समस्या पुर्वी होत्या त्याच आज देखील आहेत उलट शहराला भकास करण्याचे काम या मंडळीने केले आहे. बीड मध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस होऊन देखील आज शहरात नियमित व स्वच्छ पाणी पुरवठा होत नाही, घंटा गाडी नाही, रस्ते, लाईट, नाल्याचे प्रश्न कायम आहेत. शहरात ठीक ठिकाणी कचरा स्वच्छता नाही. आरोग्य, शिक्षण यासारखे अनेक प्रश्न शहरात आहेत. मोकाट जनावरे, कुत्री यांचा बंदोबस्त होत नाही. शहरात जेष्ठ नागरिक, महिला, बालकांसाठी कुठलेही सुसज्ज उद्यान नाही, पेन्शनरस पार्क नाही, सार्वजनिक शौचालय नाहीत, व्यायामशाळा नाहीत, क्रीडाप्रेमींना कुठलीच व्यवस्था नाही, पेठबीड भागात क्रीडा संकुलाचा प्रश्न मार्गी लागला नाही, शहराचे ग्रामदैवत कणकालेश्वर मंदिर, खंडेश्वरी मंदिर, शहेनशावली दर्गा यासारखे अनेक धार्मिक स्थळे देखील धोक्यात आहेत, महिला

►► पान २ वर

# आ.विजयसिंह पंडित यांची लोकसेना भवनला भेट

## संघर्षयोध्दा इलियास इनामदार यांची भेट घेवून सामाजिक विषयावर केली चर्चा अजीत दादा पवार यांचे हात बळकट करण्यासाठी राष्ट्रवादीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे केले आवाहन



बीड । दिव्य न्युज

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या म्हणजेच नगर परिषदेच्या निवडणूका लागल्या आहे अनेक पक्षाकडुन उमेदवाऱ्या जाहिर झालेले आहे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाकडुन भीमकन्या माजी नायाब तहसीलदार प्रेमलता दादासाहेब पारवे यांना उमेदवारी मिळालेली आहे

याविषयी गेवराईचे आमदार व बीडचे प्रभारी मा. विजयसिंह पंडित यांनी लोकसेना भवनला भेट देवून संघर्षयोध्दा इलियास इनामदार यांची भेट घेतली सामाजिक विषय जसे मुस्लिम आरक्षण, अल्पसंख्याक संरक्षण कायदा, मौलाना आज़ाद आर्थिक विकास महामंडळाचे बजेट, राज्यातील प्रत्येक जिल्हयात अल्पसंख्याक कल्याण समिति गठीत करण्यावर भर दयावी बीडला मंजुर झालेले उर्दू घर, मुलींचे हॉस्टेल बालेपीर भागातील नदीकाठचा वाहुन गेलेला रस्ता संरक्षण भींतीसह या विषयावर झाली चर्चा जर आपण राज्याचे उपमुख्यमंत्री मा.ना. अजीत दादा पवार यांच्याद्वारे काही विषय विधीमंडळाद्वारे सोडवा व काही विषय नगरपालिकेद्वारे सोडवण्याचे आश्वासन बीड शहरवासीयांना या भेटीतुन आपण देत असाल तर आम्ही तुमच्या उमेदवारांना निवडुण आणण्यासाठी मदत करु यावेळी आ. विजयसिंह पंडित यांनी सांगितले की आपण दिलेले सामाजिक विषय मा. अजित दादा पवार यांच्यासोबत चर्चा करुन सोडवण्यात येतील दादाचे हात बळकट करण्यासाठी राष्ट्रवादीच्या उमेदवारांना विजयी करण्यासाठी बळ देण्याची विंनती याठिकाणी केली. लोकसेना संघटनेच्या वतीने राष्ट्रवादीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार भीमकन्या प्रेमलता दादासाहेब पारवे यांना जाहिर पाठिंबा लोकसेना संघटना प्रमुख ड प्रा इलियास इनामदार यांनी घोषीत केला आहे. सोबत लोकसेना संघटनेच्या सामाजिक आंदोलनामध्ये प्रत्येक पक्षाचे नेते कार्यकर्ते सहभागी असतात सर्वांसोबत आमचे आंदोलनकारी संबध असल्यामुळे प्रत्येक वार्डातील उमेदवाराने येवून भेट

►► पान २ वर


हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफिससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०